# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.06.2026** **वार:बुधवार**

1. राष्ट्रपतींच्या हस्ते दुसऱ्या टप्प्यातील पद्म पुरस्कार प्रदान; राज्यातील सात मान्यवरांचा सन्मान
2. राज्यातल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात अंमली पदार्थविरोधीकृती दलाची स्थापना करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
3. एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वेतनवाढीचा लाभ देण्याची परिवहन मंत्र्यांची घोषणा आणि
4. राज्याच्या अनेक जिल्ह्यात मॉन्सूनची लक्षणीय प्रगती

**पद्म**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत पद्म पुरस्कारांच्या दुसऱ्या टप्प्यातले सन्मान प्रदान करण्यात आले. राज्यातल्या 7 मान्यवरांचा कालच्या सन्मानार्थींमध्ये समावेश होता. पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस, वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे 89 वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा, अभिनेते, दिग्दर्शक आर. माधवन, आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला. चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या तिन्ही माध्यमांमध्ये चार दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**विधिमंडळ**

राज्यातल्या प्रत्येक पोलिस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कृती दलाची स्थापना करू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. या कृती दलात कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल. त्यांना भ्रष्टाचार विरोधी पथक आणि नक्षल विरोधी पथकाप्रमाणे अतिरिक्त भत्ते आणि पदोन्नती दिली जाईल, असंही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्याचवेळी ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत जास्त अंमली पदार्थ सापडतील तिथल्या पोलिस निरीक्षकावर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. याबाबत माहिती देतांना मुख्यमंत्री म्हणाले….

**मुंबई पोलिसांचं अभिनंदन याकरता केलं पाहिजे की देशभरातल्या राज्यांमध्ये मुंबई पोलिसांनी ऑपरेशन केले. देशभरात म्हणजे केवळ मुंबईत नाही. तर देशातल्या चार पाच राज्यात जाऊन एमडी चे त्या त्या राज्यातले तेलंगणात आपण उध्वस्त केलं, गुजरातमध्ये आपण उध्वस्त केलं. युपी मध्ये जाऊन आपण उध्वस्त केलं. आपण जी मागणी केली आहे या पोलिस स्टेशन मध्ये वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत असतील. इथल्या पीआयवर कारवाई केली जाईल आणि दुसरं आपण काय म्हटलं होतं दुसरा हा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आहे रिहॅबिलिटेशन सेंटर हे केल्याशिवाय आपण आपले जे तरुण आहेत त्यातनं बाहेर काढू शकत नाही या संदर्भात तात्काळ रिहॅबिलिटेशन सेंटर करता जागा उपलब्ध करून द्यावी अशा पद्धतीनं महानगरपालिकेला निर्देश देण्यात येतील आणि लवकरात लवकर रिहॅबिलिटेशन सेंटर सुरु करण्यात येईल.**

महावितरणची स्थापित क्षमता येत्या 5 वर्षांत 78 हजार मेगावॅट पलीकडे नेण्याचं नियोजन असल्याची माहिती फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत साडे 19 टक्के अधिक वीज मागणी नोंदवण्यात आल्याचे ते म्हणाले.

राज्यात तिहेरी तलाक प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल आणि कोणत्याही महिलेवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरांत दिली.

विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र अभयारण्य तसंच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खानदेशातल्या प्रत्येक जिल्ह्यात बिबट्या सफारी सुरू करण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या दरम्यान केली. वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबातल्या सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी देण्याचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या समोर सादर केला जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.

समान नागरी कायदा लागू करण्यासाठी आवश्यक विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या दरम्यान दिली.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडील काही खात्यांच्या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी प्रभारी मंत्र्यांची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. त्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. आधीच्या काळात हे होत नव्हतं असा दावा विरोधकांनी केला. मात्र यापूर्वीच्या सरकारच्या काळात देखील प्रभारी मंत्र्यांची नेमणूक होत होती आणि हे संविधानाच्या अनुसार असल्याचं नार्वेकर म्हणाले. अध्यक्षांच्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. दरम्यान, विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा काल शपथविधी झाला.

शासनानं राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतन वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. या बाबतची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल विधानसभा आणि विधानपरिषदेत केली. एसटी महामंडळातील सुमारे 86 हजार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय देण्यासाठीहा निर्णय घेतला आहे. एसटी ही राज्यातल्या जनतेची जीवनवाहिनी असून या सेवेमागे एसटी कर्मचाऱ्यांचं योगदान मोलाचं असल्याचं सरनाईक म्हणाले.

एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता 53 टक्क्यांवरून 58 टक्के करण्यात आला आहे; तसंच घरभाडे भत्त्यातही वाढ करण्यात आली आहे. तर वार्षिक वेतनवाढीचा दर 2 टक्क्यांवरून 3 टक्के करण्यात आला आहे. एसटी कडे पुरेशा प्रमाणात गाड्या उपलब्ध आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात मागणी करणाऱ्यांना अतिरिक्त गाड्या पुरवल्या जातील असं आश्वासन सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. खासगी प्रवासी बस चालक मालकांनी बसमधून कुरिअर पार्सल किंवा अवैध माल वाहतूक केल्यास त्यांचा परवाना निलंबित करण्यात येईल, असंही सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**ड्रोन, आपत्ती-बैठका**

राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय'-प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. महा एआय प्लॅटफॉर्मबाबत विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री काल बोलत होते. या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातल्या विविध विभागात लवकरच होणार असल्याचं ते म्हणाले.

सर्वाधिक मूल्य असलेल्या पिकांच्या नैसर्गिक आपत्तीत होणाऱ्या नुकसानीची अचूक आकडेवारी मिळविण्यासाठी कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन यांनी संयुक्तरित्या ड्रोनच्या मदतीनं सर्वेक्षण करण्यासाठी कार्यवाही करावी. असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. जळगाव जिल्ह्यातल्या केळीबाग नुकसानासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या

बैठकीत ते बोलत होते. यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक माहिती मिळेल आणि पीक विमा कंपन्यांना भरपाई देताना कोणतीही अडचण येणार नाही, असं ते म्हणाले.

**कृषी पुरस्कार**

कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या राज्यातल्या शेतकरी, महिला शेतकरी, कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी 2023 आणि 2024 या वर्षांचे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली असून 1 जुलै रोजी मुंबईत पुरस्कार वितरण होणार आहे. एकंदर 189 पुरस्कारार्थींचा गौरव यावेळी करण्यात येणार आहे.

**व्यावसायिक नाट्य**

36 व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत भद्रकाली प्रॉडक्शन्स या संस्थेच्या 'करुणाष्टके' या नाटकाला साडेसात लाखाचं प्रथम पारितोषिक जाहीर झालं आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयानं प्रसिध्दीपत्रकाद्वारे याबाबतची घोषणा केली आहे. जिगिषा अष्टविनायक या संस्थेच्या 'भूमिका' या नाटकानं द्वितीय, तर जिगिषा क्रिएशन्स या संस्थेच्या 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय' या नाटकानं तृतीय पारितोषिक पटकावलं आहे.

**निधन-अहिल्यानगर**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक शिरीष मोडक यांचं काल अहिल्यानगरमध्ये अल्प आजारानं निधन झालं. ते 72 वर्षांचे होते. गणित आणि विज्ञान विषयाचे शिक्षक असलेले मोडक हे हिंद सेवा मंडळ या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नगर शाखेचे ते काही काळ उपाध्यक्ष होते.

**पाऊस**

राज्याच्या अनेक जिल्ह्यात मॉन्सूननं लक्षणीय प्रगती केली आहे. **पुणे** शहर आणि परिसरात काल संध्याकाळनंतर पावसाची संततधार होती. **कोल्हापूर** जिल्ह्यातही पावसानं जोर धरला असून बळीराजा सुखावला आहे. **रत्नागिरी**मध्ये कोसळणाऱ्या पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर **पालघर** जिल्ह्यात काल दिवसभर पावसाची रिपरिप सुरु होती. **सातारा** शहर, आणि जिल्ह्यातल्या पश्चिम भागात काल दुपारनंतर पाऊस पडला. **यवतमाळ**मध्ये कळंब तालुक्यात वीज पडून दोघांचा मृत्यू झाला. तर एक तरुण जखमी झाला. **धुळे** तसंच **नाशिक** जिल्ह्यात काल सलग दुसऱ्या दिवशी दमदार पावसानं हजेरी लावली. **जालना** शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात आज पहाटेपासून मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. **अकोल्यात** काल रात्रीपासून रिमझिम पाऊस पडत आहे. **धाराशिव** शहर आणि परिसरात सकाळी सहा वाजल्यापासून पावसाची रिमझिम सुरु आहे. खरीप पेरणीच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. **सांगली**सह जिल्ह्यात कालपासून हलक्या सरी पडत आहेत. मात्र पेरणीसाठी पुरेसा पाऊस नाही.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस काल मध्य अरबी समुद्राच्या उर्वरित भागांमध्ये दाखल झाला आहे. यामुळं कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. तर मराठवाडा आणि विदर्भात वीजांसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. किनारपट्टी लगतच्या भागातही जोरदार वारे वाहतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.